# बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण

## भूगोलशास्त्र विभाग

## प्रकल्प अहवाल

"पाटण तालुक्यातील भूस्खलनाचा भौगोलिक अभ्यास"

वर्ग : बी. ए. भाग - ३

रोल नं .

प्रात्यक्षिक भूगोलशास्त्र पे. क. १७

सन

२०२३-२४

Koyana Education Societys

# BALASAHEB DESAI COLLEGE, PATAN (SATARA)

## DEPARTMENT Of GEOGRAPHY

## LABORATORY CERTIFICATE

This is certify that Mr./Miss ....Gavhane Tanuja Shivaji........ .............................................. Roll No. ....578........ has satisfactorily completed the Journal / Village Land Use Survey / Project / Study Tour Report as per the Syllabus of Geography laid down by Shivaji University, Kolhapur during the academic year 2023 - 2024

Exam No: ..........................

Date: ....6/3/2024..................

Teacher in Charge

Examiner

Head,
Department Of Geography

HEAD
Deparment of Geography
Balasaheb Desai College, Pata

# अनुक्रमणिका


| अ.न | तपशील | पान.क्र |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | उद्देश | ४ |
| ३ | संशोधन पद्धती | ५ |
| ४ | स्त्रोत | ६ |
| ५ | पाटण तालुक्याची भौगोलिक माहिती | ७ |
| ६ | गोषवारा | ८ |
| ७ | विश्लेषण | ९ |
| ८ | निष्कर्ष | १२ |
| ९ | उपाययोजन | १३ |
| १० | संदर्भ | १४ |

> प्रस्तावना

भूस्खलन ही क्रिया भूकंप व ज्वालामुखी यांच्यासारखीच विनाशकारी आहे. मात्र, याचे अनुमान काढणे बाकीच्यांपेक्षा तुलनेने सोप्पे आहे. कारण भूस्खलन हे उघड्या डोळयांनी आपण पाहू शकतो. तसेच काही वेळा भूस्खलनाचा वेग बराच कमी असतो व त्यामुळेही स्वतःचा जीवही वाचवणे यात शक्य असते.

भूस्खलनाचे दोन प्रकार असतात वेगवान भूस्खलन व सावकाश भूस्खलन. वेगवान स्खलन हे काही क्षणांमध्ये होते. याचा वेग इतका असतो की, तो याच्या प्रवाहात येणाऱ्या कोणत्याही गोष्टीला आपल्याबरोबर घेऊन जातो. याचे अनुमान सहसा काढणे शक्य होत नाही. अनुमान काढता आले तरी, इतक्या तत्काळ कोणतीही उपाययोजना करणे फारच कठीण असते. वेगवान स्खलनाचे वहन (Flowage), स्खलन (Sliding) व डोंगरकड्यांवरून खडक कोसळणे (Rock toppling) असे अनेक याचे प्रकार असतात. हळू स्खलनाचे अनुमान काढणे शक्य असते. हे स्खलन वर्षानुवर्षे चालू असू शकते. याचा वेग फारच कमी असतो. हळू भूस्खलनामध्ये 'स्खलन' हा प्रकार असतो. 'जमीन खचणे' हा प्रकारही हळू स्खलनातच मोडतो. भूकंप व ज्वालामुखीच्या उद्रेकाप्रमाणे भूस्खलनही मुख्यतः जमिनीचे बलीय संतुलन बिघडल्यामुळेच होते. तसेच जेव्हा एका वस्तूमधील दोन कणांमध्ये कोणत्याही चिकट पदार्थाशिवाय आकर्षण निर्माण होते, तेव्हा त्याला 'घर्षणीय बल' (Friction force, Shear force, cohesion) म्हणतात. कोणत्याही कारणामुळे जर जमिनीत कंपने निर्माण झाली व त्यामुळे जमिनीच्या उतारावरील मातीच्या कणांमधील घर्षणीय बल कमी झाले, तर भूस्खलन होऊ शकते. 23/3/2024 रोजी पाटण तालुक्यातील आंबेघर, टोळेवाडी या ठिकाणी पाहटे ४ वाजता भूस्खलन झाले होते.

## ➢ प्रकल्पाची उदिष्टे

१) पाटण मधील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) पाटण मधील भूस्खलनामुळे होणाऱ्या पर्यावरणीय बदलांचा अभ्यास करणे.

## ➢ संशोधन पद्धती

आम्ही भूस्खलन विषयी माहिती घेण्यासाठी टोळेवाडी जवळील परिसरातील लोकांना भूस्खलनाविषयी सविस्तर माहिती विचारली. त्या भूस्खलनामुळे कोणकोणत्या गोष्टींवर परिणाम झाला? जीवित हानी किती झाली? या बद्दल संपूर्ण माहिती विचारली. व थोड्या प्रमाणात इंटरनेट च्या माध्यमातून आम्ही माहिती मिळवली.

त्याच बरोबर मिळालेल्या माहितीचा व आकडेवारीचा सरासरी पद्धतीने व टक्केवारी पद्धतीने विश्लेषण केले.

**सरासरी = एकूण संख्याची बेरीज /एकूण संख्या**

**क्केवारी = (आलेली संख्या / ऐकून संख्या ) x १००**

## माहिती स्त्रोत:

प्रस्तुत प्रकल्प हा पाटण तालुक्यातील भूस्खलन या विषयावर करण्यात आला आहे. प्रकल्प करण्यासाठी खालील स्त्रोत चा वापर केला आहे.

१) प्रत्यक्ष मुलाखत

२) https://mr.vikaspedia.in/social-welfare/भूस्खलन

३) वर्तमानपत्र

## ➢ गोषवारा

पाटण तालुक्यातील मौजे टोळेवाडी येथील भूस्खलनाचा भौगोलिक अभ्यास करणे.